'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यासाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सअ‍ॅप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू


पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
संपर्क : मो. ९०११२०१४१४
कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई
Email ID : shabdarutu@gmail.com

* वर्ष २ रे * अंक ५१ वा * रविवार दि. २१ सप्टेंबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)


### बोगस लाभार्थ्यांचा सरकारकडे गोल्डन डेटा

**मुंबई ।** राज्यातल्या नागरिकांचा गोल्डन डेटा तयार करण्यात आला आहे. आगामी २ ऑक्टोबर २०२५ रोजी सरकार गोल्डन डेटा जाहीर करणार आहे. सरकारी योजनांतील बोगस लाभार्थी शोधण्यासाठी गोल्डन डेटा तयार करण्यात आला आहे. गोल्डन डेटामध्ये सर्व नागरिकांची इत्थंभूत माहिती असणार आहे. त्यामुळे बोगस लाभार्थी रोखण्यासाठी राज्य सरकारचं हे मोठं पाऊल असल्याचं बोललं जात आहे. गोल्डन डेटामध्ये महाराष्ट्रातील सर्व नागरिकांची असणार इत्यंभूत माहीती आहे.

**नवी कोरी पुस्तकं**




**चाकोरीपलीकडचा**
: लेखकाचे नाव :
**जितेंद्र कुवर**
किंमत रु. : २००/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**संदर्भासह एकांकिका**
: लेखकाचे नाव :
**रंगनाथ पठारे**
किंमत रु. : ४४०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# मणिपूरमध्ये आसाम रायफल्सच्या ताफ्यावर अंदाधूंद गोळीबार

## २ जवान शहीद, ४ जखमी । बिष्णुपूर जिल्ह्यात दहशतवाद्यांचा भ्याड हल्ला; राज्यपाल व माजी मुख्यमंत्र्यांनी केला निषेध

**इंफाळ :** मणिपूरमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराचा भडका उडाला असून, बिष्णुपूर जिल्ह्यात शुक्रवारी (२० सप्टेंबर) सायंकाळी अज्ञात दहशतवाद्यांनी आसाम रायफल्सच्या जवानांच्या वाहनावर हल्ला केला. या भ्याड हल्ल्यात दोन जवान शहीद झाले असून, चार जवान जखमी झाले आहेत.

ही घटना शुक्रवारी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास नाम्बोल सबल लेइकाई परिसरात घडली. जवानांचे वाहन विष्णुपूरच्या दिशेने जात असताना अचानक





दहशतवाद्यांनी व्यस्त रस्त्यावर त्यांच्या वाहनावर अंदाधुंद गोळीबार केला. हल्ल्यानंतर दहशतवादी एका पांढऱ्या व्हॅनमधून पळून गेल्याचे सांगण्यात येत आहे. रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर सुरक्षा दलांनी हल्लेखोरांना पकडण्यासाठी तातडीने शोधमोहीम सुरू केली आहे.





या हल्ल्याचा मणिपूरचे राज्यपाल अजय कुमार भल्ला यांनी तीव्र निषेध केला आहे. देशाच्या सुरक्षेसाठी दोन शूर जवान शहीद झाले. असे घृणास्पद हल्ले कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच, त्यांनी शहीदांच्या कुटुंबीयांप्रती शोकसंवेदना व्यक्त करत जखमींना लवकर बरे वाटावे अशी प्रार्थना केली आहे.

माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनीही या हल्ल्याबद्दल दु:ख व्यक्त केले. ३३ आसाम रायफल्सच्या शूर जवानांवरील हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. शहीदांचे शौर्य आणि बलिदान कायम स्मरणात राहील. या गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळायलाच हवी, असे ते म्हणाले.

या हल्ल्यामागे मोठा कट असण्याची शक्यता वर्तवली जात असून, जवानांच्या मार्गावरील सुरक्षा व्यवस्थेत काही त्रुटी होत्या का, याचाही तपास सुरू आहे. या घटनेची छायाचित्रे समाजमाध्यमांवर व्हायरल झाली असून, या हल्ल्याने राज्यात पुन्हा एकदा तणाव वाढला आहे.. हल्ल्यात एक कनिष्ठ अधिकारी आणि एक जवान शहीद झाले. चार जखमी जवानांना पोलीस आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने तात्काळ आहे

# केंद्र सरकारचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष : पवार

## शेतकरी संघटना अधिक प्रभावी करणे गरजेचे



**नाशिक :** आज केंद्र सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत आहे. शेतीला भाव नाही. कांदा निर्यातीवर बंधने आहेत, देशात मुबलक कापूस उपलब्ध असताना कापूस आयात केला जात आहे. त्यामुळ शेतकरी संघटना अधिक प्रभावी करणे गरजेचे आहे, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांनी केंद्र सरकारवर टीका केली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर नाशिकमध्ये पार पडले. या कार्यक्रमात ते बोलत होते. एवढा मोठा जिल्हा असताना देखील या शेतकऱ्यांची नाशिक जिल्हा बँक आजारी आहे. प्रचंड थकबाकी झाली आहे. नाशिकच एक वैशिष्ट म्हणाजे उत्तम शेती करणारा हा जिल्हा आहे. शेतीवर नाशिककरांचे लक्ष आहे. आधुनिक शेतीचा विचार करणारा हा शेतकरी आहे. नवनवीन प्रयोग इथ पाहायला मिळतात. महाराष्ट्रातील शेतकरी संघर्ष हा करण्यासाठी सत्यावर उतरला होता, शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी रस्त्यावर उतरला होता याची सुरुवात नाशिकमध्ये झाली होती. कांद्याचे सोयाबीनचे उत्पन करणारा जिल्हा म्हणजे नाशिक आहे. भारत कृषी प्रधान देश आहे, **(पान २ वर)**

### ईव्हीएमवर दिसणार उमेदवारांचे फोटो

**नवी दिल्ली :** बिहार विधानसभा निवडणुकांपासून ईव्हीएममध्ये उमेदवारांचे रंगीत फोटो दिसणार असल्याची माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. समान नाव असणाऱ्या उमेदवारांमुळे अनेकदा मतदारांमध्ये गोंधळ होतो यावर उपाय म्हणून आता उमेदवाराचा रंगीत फोटो ईव्हीएमवर लावला जाईल, ज्यामुळे मतदारांना उमेदवाराची योग्य ओळख पटवून मतदान करता येईल असं निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

### मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी

# 'पानिपत'कार विश्वास पाटील



**सातारा :** साताऱ्यामध्ये जानेवारीत होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत 'पानिपत'कार विश्वास पाटील यांच्या नावाची निवड झाली आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत 'पानिपत'कार विश्वास पाटील 'कोसला'कार भालचंद्र नेमाडे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठीच्या समितीचे अध्यक्ष रंगनाथ पठारे यांच्याही नावाची चर्चा होती. नेमाडे यांनी यापूर्वीच नकार दिला असल्याने विश्वास पाटील यांचे नाव अंतिम होणार असल्याची जोरदार चर्चा होती. आजच्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या **(पान २ वर)**

### संक्षिप्त

#### नविन एनिमेशन, गेमिंग धोरणाला मंजुरी

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ बैठकीत नविन एनिमेशन आणि गेमिंग धोरणाला मंजुरी देण्यात आली. तसेच मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निर्वाह भत्ता तसेच विद्यार्थीनीसाठीच्या स्वच्छता प्रसाधन भत्त्यात सुमारे दुपटीने वाढ करण्याचा निर्णयही मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. उद्योग विभागाने महाराष्ट्र निमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिलिटी धोरण २०२५ जाहीर केले आहे.

# गांधी यांनी फोडला मत चोरीचा हायड्रोजन बॉम्ब

## निवडणूक आयोगावर भाजपशी संघटन केल्याचा आरोप

**नवी दिल्ली :** मतदार यादीतून दलित, मागासवर्गीय आणि आदिवासी मतदारांची नावे मुद्दामहून वगळली जात आहेत. माझ्याकडे १०० टक्के पुरावे आहेत, असा दावा करत काँग्रेस नेते खा. राहूल गांधी यांनी निवडणूक आयोग मुख्य आयुक्त चोरांना पाठीशी घालत असल्याचा घणाघाती आरोप केला.

राहूल गांधी यांनी गुरुवारी दिल्लीतील इंदिरा भवन सभागृहात घेतलेल्या



पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगावर संविधानाविरुद्ध गुन्हा केल्याचा आरोप केला. निवडणूक आयोग भाजपसोबत मिळून मत चोरी करत आहे, असा थेट हल्ला त्यांनी चढवला. बिहारमधील १ सप्टेंबर रोजीच्या कार्यक्रमात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही निशाणा साधला होता. हायड्रोजन बॉम्ब फोडल्यानंतर पंतप्रधान देशाचा सामना करू शकणार नाहीत, असे त्यांनी म्हटले होते.

राहूल गांधी यांनी गेल्या काही महिन्यांपासून मत चोरीचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला आहे. बिहारमधील मतदार जागृती यात्रेच्या समारंभात त्यांनी हायड्रोजन बॉम्ब फोडण्याची **(पान २ वर)**

# स्वप्नपूर्ती झाली... बीड-नगर रेल्वे धावली!

## लोकार्पण सोहळा श्रेयवादाच्या फटाक्यांनी गाजला

**बीड :** जिल्ह्यातील नागरिकांच्या दोन पिढ्यांहून अधिक काळ चाललेल्या संघर्षाला अखेर बुधवारी (१७ सप्टेंबर) रोजी पूर्णविराम मिळाला. बीड ते अहिल्यानगर अशी रेल्वे सुरू झाली असून त्या गाडीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी हिरवा झेंडा दाखवला.

बीडकरांसाठी ऐतिहासिक क्षण आणि जिल्ह्याच्या विकासाला गती देणारा सोहळा नव्याने उभारण्यात आलेल्या बीड रेल्वे स्थानकावर संपन्न झाला. खासदार बजरंग सोनवणे यांच्यासह बीड जिल्ह्यातील सर्वच आमदार आणि कानाकोपऱ्यातून आलेल्या जनतेच्या उपस्थितीत हा सोहळा राजकीय टोले आणि श्रेयवादाच्या फटाक्यांनी गाजला. भाषण करणाऱ्या सर्वच राजकीय नेत्यांनी बीड




रेल्वेच्या आठवणींना उजाळा दिला, रेल्वेसाठी केलेल्या संघर्षाची आठवण सांगितली. त्यानंतर, बीड-अहिल्यानगर रेल्वे मार्गावर पहिल्यांदा रेल्वे धावली. मंत्री महोदयांनी हिरवा झेंडा दाखवला अन् रेल्वेतून प्रवास करणाऱ्यांनी फोटो, व्हिडिओसह आनंद साजरा केला. **(पान २ वर)**

# राज्यात ८०,९६२ कोटींची गुंतवणूक; ४०,३०० नवीन रोजगार उपलब्ध होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नऊ कंपन्यांसोबत सामंजस्य करार

**मुंबई :** राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विविध क्षेत्रांतील नऊ कंपन्यांसोबत तब्बल ८०,९६२ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या करारामुळे राज्यात ४०,३०० नवीन रोजगार निर्माण होतील. हे प्रकल्प गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, रायगड, छत्रपती संभाजीनगर आणि सातारा या जिल्ह्यांमध्ये उभारले जाणार आहेत, ज्यामुळे विदर्भ, मराठवाडा आणि कोकणातील औद्योगिक विकासाला गती मिळेल.

मुंबईतील गोरेगाव येथील नेस्को संकुलात आयोजित स्टीलेक्स २०२५ स्टील महाकुंभ या कार्यक्रमात




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत हे करार झाले. केंद्रीय अक्षय्य व अपारंपरिक ऊर्जामंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनवलगन, आणि यूएनडीपीच्या भारतातील प्रतिनिधी डॉ. अँजेला लुसिगी उपस्थित होत्या. याप्रसंगी, हरित पोलाद निर्मितीकडे यशस्वीपणे वाटचाल करणाऱ्या राज्यातील आठ उद्योगांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते हरित पोलादप्रमाणपत्रवितरितकरण्यातआले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, उत्पादन, उत्पादकता आणि खर्च किफायतशीरतेसह पोलाद प्रकल्पांमध्ये शाश्वततेला प्राधान्य दिले जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ग्रीन स्टील मिशन या १५ हजार कोटी रुपयांच्या योजनेकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. राज्यात जास्तीत जास्त हरित पोलाद प्रकल्प उभे राहतील आणि या वाजारपेठेत देशांतर्गत तसेच निर्यात आघाडीवर राज्याचे वर्चस्व राहील, या दृष्टीने घोरणे आखली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले, आणि स्वच्छ वीज उपलब्ध व्हावी पोलाद प्रकल्पांसाठी स्वस्त यासाठी शाश्वत ऊर्जा स्रोतांच्या विकासावर राज्यात काम सुरू आहे. २०२३ मध्ये राज्यातील एकूण ऊर्जा निर्मितीत अक्षय्य स्रोतांचा वाटा १३ टक्के होता, तो २०२५ पर्यंत २५ टक्के आणि २०३० पर्यंत ५८ टक्क्यांवर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> ७५,००० मेगावॉट वीज निर्मितीसाठी राज्याने पंप स्टोरेज प्रकल्पांमधून सामंजस्य करार केले असून, हा आकडा लवकरच १ लाख मेगावॉटवर जाईल. तसेच, २०३२ पर्यंत शेतकऱ्यांना होणारा वीजपुरवठा पूर्णपणे सौर ऊर्जेवर आधारित असेल होईल, असेही त्यांनी सांगितले.

# मराठा आरक्षणविरोधी याचिका फेटाळली

**मुंबई :** हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णयाविरोधातील पहिली जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे.

२ सप्टेंबरच्या शासन निर्णयाविरोधात अ‍ॅड विनीत धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. सदर याचिका जनहित याचिकेच्या कक्षेत बसत नसल्याचं निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. २ सप्टेंबरच्या शासन निर्णयाला जनहित याचिकांच्या माध्यमातून आव्हान देण्यात आलं असून यासंदर्भातील जनहित याचिका ऐकण्याची गरज नाही, असं हायकोर्टाने म्हटलंय. मात्र, याचिकाकर्त्याला रीट याचिका म्हणून सक्षम कोर्टासमोर दाद मागण्याची कोर्टाने मुभा दिली आहे.

हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला मान्यता देणाऱ्या शासन निर्णविरोधातील याचिकेवर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. अ‍ॅड विनीत धोत्रे यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवरच सकाळच्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयाने **(पान २ वर)**

# जातींमध्ये संघर्ष वाढतोय, एकत्र बसून तोडगा काढा

## शरद पवारांनी परिस्थितीवर चिंता व्यक्त करत, सामंजस्य आणि एकतेचा मार्ग सुचवला

**पुणे :** सध्या सामाजिक आरक्षणाचा मुद्दा ज्वलंत बनला आहे. मराठा आणि ओबीसी समाजातील संघर्षानंतर, आता बंजारा आणि आदिवासी समाजामध्येही तणाव निर्माण झाला आहे. या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर एकत्र बसून तोडगा काढ़ा असा सल्ला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिला. ते पुण्यातील एका कार्यक्रमात बोलत होते.



पवारांनी या परिस्थितीवर चिंता व्यक्त करत, सामंजस्य आणि एकतेचा मार्ग सुचवला आहे. दोन समाजांमध्ये निर्माण झालेला तणाव मराठा आरक्षणासाठी सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर काढला. यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र, या निर्णयामुळे मराठा आणि ओबीसी आमने-सामने आले आहेत. ओबीसी नेते या निर्णयाला जोरदार विरोध करत आहेत, कारण त्यांना वाटते की मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण दिल्यास त्यांच्या हक्कांवर गदा येईल.

ही परिस्थिती अजून पूर्णपणे शांत झालेली नसतानाच, आता बंजारा समाजानेही आपली मागणी उचलून धरली आहे. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करण्याची त्यांची मागणी आहे, ज्यामुळे त्यांना आदिवासी सम जाला मिळणाऱ्या सवलतींचा फायदा घेता येईल. साहजिकच, बंजारा समाजाच्या या म ागणीला आदिवासी समाजाकडून तीव्र विरोध होत आहे. आम्ही आधीच नैसर्गिकरित्या म समाज ागासलेले आहोत, आणि आता जर आणखी एका मोठ्या समाजाला आमच्या प्रवर्गात सामील केले, तर आमच्यावर अन्याय होईल, अशी भूमिका आदिवासी नेत्यांनी घेतली आहे.

या सर्व घडामोडींवर शरद पवारांनी तीव्र चिंता व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, आज मुक्तिसंग्राम दिवस साजरा करत असताना राज्यात आनंदाचे वातावरण नाही, हे दुर्दैव आहे. ते म्हणाले की, मी यापूर्वीही सांगितले होते की समाजाची वीण दुबळी होत आहे. जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण होत आहे आणि त्यामुळे राज्याची सामाजिक एकता धोक्यात येत आहे. राज्यातील या तणावाच्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या समाजांसाठी स्वतंत्र समित्या नेम ल्या आहेत. यावरही शरद पवारांनी आपले स्पष्ट मत मांडले.

---

### पडळकर यांची जयंत पाटलांवर पातळी सोडून टीका

# पवारांनी फोन करून फडणवीसांना सुनावले

## मुख्यमंत्र्यांकडून कानउघडणी; राज्यभरातून निषेध

**पुणे :** भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांच्यावर केलेल्या टीकेच्या संदर्भात शरद पवार यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून चर्चा केली. यावेळी अशी गलीच्छ टीका करणं योग्य नाही, गोपीचंद पडळकरांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध आहे, असे शरद पवारांनी देवेंद्र फडणवीसांना सुनावले.

गोपीचंद पडळकर यांनी सांगली जिल्ह्यातील जत विधानसभा मतदारसंघात बोलताना, जयंत पाटील यांच्यावर गलिच्छ शब्दात टीका केली होती. जयंत पाटील हा बिनडोक माणूस आहे. दर आठ दिवसाला हा आपण किती बिनडोक आहे हे जयंत पाटील सिद्ध करतोय. गोपीचंद पडळकर जयंत पाटलासारखा भिकाऱ्याची औलाद नाही. कार्यक्रम घेण्याची धमक आपल्यामध्ये आहे. हा जयंत पाटील राजारामबापू पाटील यांची औलाद नसणार आहे. काहीतरी गडबड आहे, अशी पातळी सोडून टीका गोपीचंद पडळकर यांनी केली होती.

**मुख्यमंत्र्यांच्यासूचनेचे पालन करेन**

यांचा मला फोन आला होता. यासंदर्भामध्ये अशी वक्तव्य करू नका अशा पद्धतीची सूचना त्यांनी मला दिली आहे. मी त्यांच्या सूचनेचे पालन करेन. फडणवीस यांनी मला ज्या सूचना दिल्याआहेत त्या मी पाळणार आहे.

**- आ. गोपीचंद पडळकर**

---

# सव्वा लाख लाडक्या बहिणी अपात्र

**मुंबई :** महाराष्ट्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने मुळे म हिलांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य निर्माण होईल अशी अपेक्षा होती. मात्र आता या योजनेतून राज्यातील सुमारे सव्वा लाखांहून अधिक महिलांना अपात्र ठरवण्यात आलं आहे.

खोटी माहिती, बनावट दस्तऐवज आणि नियमभंग केल्यामुळे प्रशासनाने मोठा सर्व्हे करून एकाच झटक्यात लाखो महिलांना या योजनेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना असून २१ ते ६० वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपयांचं आर्थिक सहाय्य दिलं जातं. परंतु या योजनेत अनेक महिलांनी वय, कुटुंबातील सदस्यांची संख्या आणि अन्य अटींचा भंग करत अनधिकृत लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे, आता या महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

---

# पाणंद, शिवरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहीम राबवा : ना. विखे

## जिल्हास्तरीय सेवा पंधरवड्याचा राहाता येथे शुभारंभ

**शिर्डी :** गाव ते जिल्हा पातळीवरील अधिकाऱ्यांनी आपापसात समन्वय ठेवून शासकीय योजनांची अंमलबजावणी करावी. कोणत्याही दबावाला बळी न पडता पाणंद व शिवरस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी युद्धपातळीवर मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहाता येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत जिल्हास्तरीय सेवा पंधरवड्याचा (दि. १७सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर) शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खा. भाऊसाहेब बाकबीरे, आ. विठ्ठल लंघे, आ. काशिनाथ दाते, आ. अमोल खताळ, डॉ. पंकज आशिया, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आण्णासाहेब म्हस्के पाटील,ज्ञानेश्वर गोंदकर, नितीन दिनकर, दिलीप भालसिंग, अनिल मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.



सेवा पंधरवड्यात पाणंद रस्ते मोकळे करणे, विविध कागदपत्रांचे वाटप, घरकुल योजना राबवणे, वर्ग २ ची जमीन वर्ग १ मध्ये रूपांतरित करणे अशा अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे, असेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

खासदार वाकचौरे म्हणाले, सेवा पंधरवड्यामुळे सर्वसामान्य नागरिक व लाभार्थ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक होईल. घरकुलांची कामे मार्गी लागतील व पाणंद शिवरस्त्यांचे प्रश्न सुटतील.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, सेवा पंधरवड्यात जिल्ह्यात तीन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गाव नकाशावरील रस्त्यांना नंबर देणे, रस्त्यांचे वाद मिटविणे व घरकुलासाठी भूमि हीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून - देणे हे उपक्रम सुरू होतील. याशिवाय - कुळकायद्यातील वर्ग २ मधील जमीन वर्ग १ मध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया राबवली डॉ. सुजय विखे पाटील, आण्णासाहेब म्हस्के पाटील व अनिल मोहिते यांनीही याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी सेवा पंधरवड्यात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

---

पान १ वरून

## केंद्र सरकारचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष : पवार

त्याला जोडधंदा हा दुधाचा आहे. शेतीतील गोष्टी आपण अमेरिकडून घ्यायला लागलो तर शेती अडचणीत येईल. राज्यात १ हजार १८३ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या आहेत. यामध्ये विदर्भातील शेतकरी जास्त आहेत. राज्य सरकार बघ्याची भूमिका घेत असेल तर अवघड आहे असे पवार म्हणाले. लोकसभा निवडणुकांत भास्कर भगरे, शोभा बच्छाव आणि वाझे निवडून आले. तिन्ही जागा आपल्या विचाराच्या निवडून आल्याचे शरद पवार म्हणाले.

देशाचा नकाशा काढा पाकिस्तान, नेपाळ अडचणीत आहे. बांगलादेश उध्वस्त झाला आहे, त्याच्या स्वातंत्र्यसाठी भारताने कसता खाल्या होत्या. तो आपल्यासोबत नाही, श्रीलंका आपल्यासोबत नाही. देशाची धुरा मोदींच्या हातात आहे. त्यांनी आता परराष्ट्र धोरणबाबत विचारकरणे अपेक्षित आहे असे शरद पवार म्हणाले. ट्रम्प याची निती प्रत्येक वस्तूवर टॅक्स लावण्याची आहे.

महाराष्ट्रातील महत्वाच शहर नाशिक आहे. आपला पक्ष गांधी नेहरु विचारधारेवर चालणारा पक्ष आहे. नाशिकचा इतिहास पाहिला तर या जिल्ह्यात गांधी नेहरु विचारधारा या लोकांनी स्वीकारली होती. स्वातंत्र्याच्या पूर्वी नाशिकला एक अधिवेशन झालं होतं वर्किंग कमिटी बैठक झाली होती महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू उपस्थित होते. गांधी नेहरू विचार पुढे घेऊन जाण्यांच काम नाशिककरंनी केल्याचे शरद पवार म्हणाले. त्यानंतर भाऊराव हिरे, गोविंदराव देशपांडे यांनी विचारपुढे नेला. मराठी साहित्यात योगदान देणारे अनेक लोक याठिकाणी होऊ गेले. महाराष्ट्राच्या साहित्य परंपरेत कुसुमाग्रज यांच नाव घेतल्या शिवाय साहित्य पुर्ण होतं नाही. यशवंतराव चव्हाण सारखा महाराष्ट्राला मोठा नेता मिळाला. राज्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारा हा नेता होता, असे शरद पवार म्हणाले.

जवाहरलाल नेहरु यांनी भारताला सावरायचं असेल तर म हाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याला बोलवायला हवं म्हणून यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलवून घेतलं होतं. त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांनी शपथ घेताच रात्री लगेच चिनने सैन्य मागे घ्यायला सुरुवात केली. त्यावेळी यशवंतराव चव्हाण यांना नाशिक जिल्ह्यातून खासदार म्हणून बिनविरोध पाठवलं होतं अशी आठवण शरद पवार यांनी सांगितली.

सरकारच्या कमिट्या कधी एका समाजाच्या करायच्या नसतात

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात ओबीसी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत सगळे ओबीसी नेते आहेत. तर दुसरीकडे मराठा समाजासाठी जी समिती नेमण्यात आली तर त्यात महाजन सोडले तर सगळे मराठा आहेत. राज्य सरकारच्या कमिट्या कधी एका समाजाच्या करायच्या नसतात.

महाराष्ट्राची सामाजिक वीण उसवायला लागलीय : शरद पवार

हैदराबाद गॅझेटवर आधारित निर्णय घ्यावा असं सांगण्यात आलं. पण या गॅझेटमध्ये काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. व्हीजेएनटी बंजारा यांना आदिवासीचे स्थान यामध्ये देण्यात आले आहे. आता बंजारा समाजाने मागणी सुरू केली आहे. काही झालं तरी चालेल पण आता आम्हाला आदिवासीमध्ये घातलं पाहिजे. याचा अर्थ काय तर समासामाजामध्ये कटूता वाढेल, असे निर्णय घेतले जात आहेत, अशी शंका पवार यांनी उपस्थित केले. महाराष्ट्राची सामाजिक वीण उसवायला लागली आहे, ही अतिशय चिंतेची बाब असल्याचे ते म्हणाले.

## मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी 'पानिपत'कार विश्वास पाटील

पुण्यातील बैठकीत 'पानिपत'कारांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्षांची घोषणा केली. यंदा संमेलनाचं व्यासपीठ हे राजकीय व्यासपीठ होणार नाही याची काळजी घेऊ, वेगवेगळ्या दिवशी राजकीय नेते येतील यासाठी प्रयत्न करू असंही मिलिंद जोशी यांनी म्हटलं आहे.

साताऱ्यामध्ये होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचा अध्यक्ष निवडण्यासाठी पुण्यातील साहित्य परिषदेत आज सकाळी अकरा वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. साहित्य महामंडळाच्या वेगवेगळ्या शाखांकडून वेगवेगळ्या साहित्यिकांची नावे अध्यक्षपदासाठी सुचवण्यात आली होती. ज्यामध्ये रंगनाथ पठारे, विश्वास पाटील , बाळ फोंडके यांची नावे आघाडीवर होती. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलींद जोशी यांनी काही दिवसांपुर्वी भालचंद्र नेमाडे यांची देखील भेट घेऊन त्यांना अध्यक्षपदासाठी गळ घातली होती. मात्र नेमाडेंकडून प्रतिसाद मिळाला नाही. आजच्या बैठकीमध्ये विश्वास पाटील यांच्या नावावरती शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.

संमेलन ४ दिवस चालणार

* संमेलन ४ दिवस चालणार असून १,२,३ आणि ४ जानेवारी २०२६ रोजी साताऱ्यातील शाहू स्टेडियम येथे होणार आहे.
* ग्रंथडिंडी संमेलनाच्या उद्घाटनाच्या आदल्या दिवशी निघणार असून त्या दिवशी दुपारी ग्रंथ प्रदर्शनाचे, कविकट्ट्याचे आणि बालकुमारांसाठी आनंद मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी संमेलनाचे उद्घाटन होणार आहे.
* ग्रंथ प्रदर्शनाचा वाचनकांना ४ दिवस लाभ घेता येणार आहे.
* वक्तृत्व स्पर्धा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानांतर्गत विविधांगी न्याय्य दिल्या जाणार आहेत.
* निमंत्रितांची कोमलसंमेलन, संमेलनाच्या गाजलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन, मान्यवर लेखकांच्या मुलाखती, कवी संमेलन, कादंबरी कार्यशाळा असे विविध दर्जेदार कार्यक्रम होणार आहेत.
* या संमेलनासाठी प्रथमच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील सर्व पदाधिकाऱ्यांना, संमेलन सन्मानप्राप्त लेखकांना, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त निवडक लेखकांना तसेच साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षांना निमंत्रित केले जाणार आहे.

## गांधी यांनी फोडला मत चोरीचा हायड्रोजन बॉम्ब

घोषणा केली होती. आजच्या पत्रकार परिषदेत त्यांनी हा बॉम्ब नसला तरी पुराव्यांचा भक्कम आधार सादर केला. हा हायड्रोजन बॉम्ब नाही, पण आम्ही सत्य समोर आणत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. कर्नाटकातील आळंद मतदारसंघात २०२३ मधील निवडणुकीत ६.०१८ मतदारांची नावे डिलीट करण्यात आली. विशेषतः यात दलित आणि ओबीसी मतदारांचा समावेश आहे. राहल यांनी सांगितले की, सॉफ्टवेअरच्या माध्यमातून आणि बाहेरील फोन नंबर वापरून मतदार यादीतून नावे हटवण्यात आली. सूर्यकांत नावाच्या व्यक्तीने १४ मिनिटांत १२ मतदार डिलीट करण्याचे अर्ज भरले, असे त्यांनी पुराव्यासह सादर केले.

निवडणूक आयोग व्यवस्थितपणे लाखो मतदारांना लक्ष्य करून त्यांची नावे हटवत आहे, असा गंभीर आरोप राहूल यांनी केला. महाराष्ट्रातील राजूरा मतदारसंघातही हजारो मतदारांची नावे डिलीट झाल्याचा दावा त्यांनी केला. आम्ही पुराव्यांसह बोलत आहोत. दलित आणि ओबीसी समाज हा त्यांचा लक्ष्य आहे. मी माझ्या देशाच्या आणि संविधानाच्या रक्षणासाठी लढेन, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

निवडणूक आयोग आणि भाजप संगनमत करून विपक्षाला मत देणाऱ्या समाजाच्या मतांचा छेद देत असल्याचे सांगून व्हिडिओ आणि इतर पुरावे सादर केले. पत्रकार परिषदेपूर्वी काँग्रेसच्या अधिकृत पेजवर एक व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. यात सिद्ध मूसेवाल्याच्या गाण्यासह कुर्सी की पेटी बांध लीजिए असा संदेश होता. यामुळे राहूल गांधी पुन्हा एकदा मत चोरीचा मुद्दा उपस्थित करतील, अशी चर्चा रंगली होती. यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी कर्नाटकातील एका लोकसभा मतदारसंघाच्या आकडेवारीचे विश्लेषण सादर करत मत चोरीचा आरोप केला होता.

राहुल गांधींचे आरोप निराधार

कोणतीही सामान्य व्यक्ती ऑनलाइन पद्धतीनं नाव हटवू शकत नाही. नाव हटवण्यापूर्वी संबंधित आयोगाकडून मतदाराला म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. २०२३ मध्ये आळदमध्ये नावं हटवण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. त्यावेळी आम्ही एफआयआरही दाखल केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांवरील आरोप निराधार आणि अयोग्य आहेत, माझा खुलासा निवडणूक आयोगाने सोशल मीडियात केला.

## स्वप्नपूर्ती झाली... बीड-नगर रेल्वे धावली!

पहिल्याच दिवशी प्रवाशांनी बीड ते अहिल्यानगर प्रवासासाठी मार्गक्रमण केले.

बीड-अहिल्यानगर-परळी मार्गावर ही रेल्वे धावणार असून पहिल्या टप्प्यात आज बीड ते अहिल्यानगर या १६७ किमी मार्गावर बीडकरांचा प्रवास सुरू झाला आहे. त्यामुळे, बीड ते अहिल्यानगर रेल्वेने बीडकरांना प्रवास करता येईल, विशेष म्हणजे या प्रवासाचे तिकीटदरही समोर आले असून कमीत कमी १० रुपये ते जास्तीत जास्त ४० रुपयांपर्यंतचे तिकीट दर आकारण्यात येणार आहेत. म्हणजेच, बीडहून केवळ ४० रुपयांत अहिल्यानगरला जाता येईल. बीड ते अहिल्यानगर या रेल्वे प्रवासात एकूण १५ रेल्वे स्थानक असणार आहे. पहिले स्टेशन राजुरी नवगण असून बीडवरुन फक्त १० रुपयांत येथे जाता येईल. अहिल्यानगर-बीड-परळी हा संपूर्ण रेल्वेमार्ग २६१ किमीचा आहे. त्यापैकी, आज फक्त बीड-अहिल्यानगर या १६६ किमी मार्गाचा टप्पा प्रवाशांसाठी सुरू करण्यात आला आहे. उर्वरीत बीड-परळी टप्प्यातील काम अद्याप बाकी आहे.

रेल्वे स्टेशन शहरापासून ६ किमी दूर बीडचे नवे रेल्वे स्टेशन हे बीड बस स्टँडपासून ६ किलोमीटर दूर पालवण गावात आहे. बीड ते अहिल्यानगर रेल्वेचे तिकीट ४० रुपये एवढे ठेवण्यात आलं आहे. मात्र, बीड शहरापासून ६ किमी दूर असलेल्या रेल्वे स्टेशनपर्यंत पोहोचण्यासाठी रिक्षावाले १५० ते २०० रुपयांपर्यंत भाडे घेतात. मराठवाड्यातील बीडमध्ये आज रेल्वे नाही तर विकासाची वाहिनी पोहोचली आहे, त्या माध्यमातून विकासकामांना वेग मिळेल. बीडमध्ये सुरू झालेली ही रेल्वे गोपीनाथ मुंडेंना अर्पण करतो. आज सरकार सर्व परीने आपल्या पाठीशी आहे. मराठवाड्यातील सर्व प्रकल्पांना आवश्यक निधी देऊ. आजचा दिवस हा श्रेयवादाचा नाही. बीडमध्ये रेल् सुरु होण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. हा जगन्नाथाचा रथ आहे, अनेकांचा हात या कामासाठी लागला, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## मराठा आरक्षणविरोधी याचिका फेटाळली

सवाल उपस्थित केले आहेत. ओबीसी संदर्भातील शासन निर्णयाने याचिकाकर्ते बाधित कसे? असा सवाल उपस्थित करत जनहित याचिकेच्या ग्राह्यतेवरच मुंबई उच्च न्यायालयाकडून प्रश्नचिन्ह उपस्थितळे केले होते. शासन निर्णयाने कोणी शेड्युल कास्टमधील कोणीही बाधित झालं नाही, असं मुंबई उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

प्रमाणपत्र व्हॅलिडेट करून द्या

मराठा क्रांती मोर्चाची आज छत्रपती संभाजी नगरमध्ये गोलमेज परिषद पार पडली. या परिषदेमध्ये मराठा आरक्षणावर मंथन करण्यात आले. यामध्ये मराठा आरक्षण अभ्यासक तसेच तज्ज्ञांनी सहभाग घेतला. या गोलमेज परिषदेमध्ये मराठा आरक्षणाच्या संदर्भात कायदेशीर आणि घटनात्मक पैलूंवर चर्चा करण्यात आली. या परिषदेसाठी जवळपास शंभर अभ्यासक एकत्र आले होते. या जीआरचा फायदा होणार नाही. मुंबई उच्च न्यायालयाने दोन सप्टेंबर रोजी शासन आदेश निर्गमित केला आहे, पण त्या चॅलेंज करणाऱ्या विरोधातील जनहित याचिका फेटाळल्या आहेत. त्याम ळे आता या संधीचा फायदा घेऊन शासनाने यामध्ये आवश्यक आहेत ते बदल करावेत आणि हे प्रमाणपत्र व्हॅलिडेट होईल, अशा उपायोजना कराव्यात असे मराठा आरक्षण अभ्यासक डॉ. संजय लाखे म्हणाले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवासवर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |
| **नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक** | | |
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |
| **चरित्र/आत्मचरित्र** | | |
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |
| **कविता संग्रह** | | |
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानोर | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय- प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |

| | | |
|---|---|---|
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूरकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |
| **चरित्र** | | |
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

| | | |
|---|---|---|
| **सामान्यज्ञान** | | |
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |
| **शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी** | | |
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोविड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अ. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडूळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform
Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization

Vision India

Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 | +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी एकत्रित प्रयत्नांची गरज : ना. विखे

**प्रवरानगर :** सिंचन क्षेत्राचा विस्तार, शेती, उद्योग व घरगुती वापरासाठी दीर्घकालीन जलनियोजन, आणि पाण्याचा प्रत्येक थेंब सिंचनासाठी हेच नदीजोड प्रकल्पांचे मुख्य उद्दिष्ट आहे. मोठ्या जलप्रकल्पांमुळे शाश्वत विकास, दुष्काळ नियंत्रण आणि संतुलित प्रगती साध्य होईल, असा विश्वास व्यक्त करतानाच, भविष्यात जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांनी केले.

राज्यात हाती घेण्यात येत असलेल्या नदीजोड प्रकल्पा संदर्भात गुंतवणूकदारांशी चर्चा करण्यासाठी शिर्डी येथे आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात मंत्री विखेबोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, जलसंपदाविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे यांच्यासह

## ‘नदीजोड’ संदर्भात शिर्डीत चर्चासत्र

जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि इन्फास्ट्रक्चर कंपनी, बँकर्सचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील जलसंपदा विकासाला नवी दिशा देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या दिवशी चर्चासत्र होत असल्याचे सांगून मंत्री विखे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि



(छाया : परेश कापसे)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाने राज्याच्या जलसिंचनामध्ये भरीव वाढ करण्यास प्राधान्य दिले आहे. या महत्वाकांक्षी प्रकल्पात तज्ज्ञ, खासगी भागीदार, वित्तीय संस्था तसेच जनतेचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे.

राज्यात उभारण्यात येणारे सर्वच नदीजोड प्रकल्प परिवर्तनकारी ठरतील. या प्रकल्पांमुळे पाणीटंचाई दूर होऊन विकासाचा समतोल साधण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे त्यांची आर्थिक संपन्नता होणार आहे. ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होणार आहे. शहरी अर्थव्यवस्था व औद्योगिक वाढीसही चालना मिळेल. पुढील पिढ्यांसाठी पाण्याची उपलब्धता होईल, असा विश्वास विखे यांनी व्यक्त केला. नदीजोड प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या, वित्तपुरवठा, जमीन अधिग्रहण हे विषय प्राधान्याने सोडवले जातील. या प्रकल्पामध्ये गुंतवणूक करणाऱ्या हितधारकांकडून नवनवीन कल्पना व सहयोगी उपायांचे स्वागतही करण्यात येईल, असे मंत्री विखे यांनी स्पष्ट केले. प्रवीण परदेशी दीपक कपूर यांनी दमनगंगा - वैतरणा गोदावरी, नार- पार- गिरणा, दमनगंगा - एकदरे- गोदावरी, वैनगंगा नळगंगा आणि उल्हास -वैतरणा-गोदावरी या नदीजोड प्रकल्पाबाबत माहिती दिली. चर्चासत्रात १३ कंपन्यांच्या २२ प्रतिनिधींनी आणि सहा बँकर्सच्या १५ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. सहसचिव तथा मुख्य अभियंता प्रसाद नार्वेकर यांनी सादरीकरण केले. संजय बेलसरे यांनी आभार मानले.

# सहा महिन्यांत ४०.८१ लाख मतदारांची वाढ

**मुंबई :** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान अवघ्या सहा महिन्यांत ४०.८१ लाख मतदारांची वाढ झाली आहे. आता विधानसभा निवडणुकीनंतर अवघ्या सात महिन्यात राज्यात आणखी १४.७९ लाख नव्या मतदारांची भर पडली आहे. विशेष म्हणजे, ही वाढ आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर थेट परिणाम करणारी उरणार आहे.

२७ नोव्हेंबर २०२४ ते ३० जून २०२५ या कालावधीत राज्यातील मतदारांची संख्या ९,७०,२५,११९ वरून ९,८४,९६,६२६ इतकी झाली आहे. म्हणजेच एकूण १८,८०,५५३ नव्या मतदारांनी नोंदणी केली आहे. याच दरम्यान, ४,०९,०४६ जुन्या मतदाराची नावे वगळण्यात आली असून, अंतिमतः एकूण १४,७१,५०७ मतदारांची बाद झालेली आहे. पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसाठी विधानसभा निवडणुकीतील मतदार यादी वापरण्याचा विचार होता. मात्र, आता १ जुलै २०२५ पर्यंत अद्ययावत केलेली यादीच अंतिम मानण्यात येणार आहे. कारण मतदार नोंदणी ही एक सतत सुरू असणारी प्रक्रिया आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# एच१बी व्हिसाच्या शुल्कात वाढ

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच १ बी व्हिसा प्रक्रियेत मोठे बदल करत नव्या नियमांची घोषणा केली आहे. या अंतर्गत, आता एच १ बी व्हिसासाठी अर्ज करताना तब्बल १ लाख अमेरिकी डॉलर (सुमारे ८३ लाख रुपये) भरावे लागणार आहे. त्यामुळे अमेरिकतेत नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्यांचा स्वप्न भंग होणार आहे.

हा नव्या बदलांमुळे परदेशी कुशल कामगारांची




अमेरिकेत भरती करणे कंपन्यांसाठी अधिक खर्चिक ठरणार आहे. आतापर्यंत कंपन्यांना लॉटरीसाठी २१५ डॉलर व अर्जासाठी (फॉर्म -१२९) ७८० डॉलर भरावे लागत होते. त्यामुळे विशेषतः लहान व्यवसाय व स्टार्टअप कंपन्यांना मोठा फटका बसेल.

# दहशतवादी मलिकचे प्रतिज्ञापत्रात खळबळजनक दावे

**नवी दिल्ली :** दहशतवादी आणि जम्मू आणि काश्मीर लिबरेशन फ्रंट या बंदी घातलेल्या संघटनेचा नेता यासिन मलिकने दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सविस्तर प्रतिज्ञापत्रात अनेक दावे केले आहेत, ज्यात मोठ्या राजकीय व्यक्ती आणि धार्मिक नेत्यांशी त्याचा भूतकाळात आलेल्या संबंधांचा समावेश आहे.

एनडीटीव्हीने मिळवलेल्या प्रतिज्ञापत्रात, यासिन मलिकने दोन दशकांत विविध लोकांशी साधलेल्या संवादांचा इतिहास आहे. यात दोन शंकराचार्यांशी उच्चस्तरीय संवाद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (आरएसएस) नेत्यांशी व्यापक संपर्क, भारतीय गुप्तचर अधिकाऱ्यांशी बैठका आणि माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या २०००-०१ च्या रमजान शस्त्रबंदीला पाठिंबा देण्यात त्याची कथित भूमिका यांचा उल्लेख आहे.

दरम्यान, हे सर्व यासिन मलिकने न्यायालयात दाखल केलेल दावे आहेत. त्याने उल्लेख केलेल्या कोणत्याही नेत्यांनी किवा संघटनांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

विवेकानंद इंटरनॅशनल फाउंडेशनचे तत्कालीन अध्यक्ष ॲडमिरल केके नायर यांनी त्याला त्यांच्या निवासस्थानी आणि इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये ‘‘दुपारच्या जेवणासाठी‘‘ अनेक वेळा आमंत्रित केले होते. दिल्लीत अजित डोवाल यांना भेटल्याचेही त्याने सांगितले आहे.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | उद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

# अर्शदीप सिंहचं विक्रमी विकेट्सचे शतक पूर्ण




मुंबई : मुंबई : आशिया कप २०२५ मधील भारत आणि ओमान यांच्यामध्ये पार पडलेल्या सामन्यात २१ धावांनी विजय मिळवला. हा सामना भारतीय संघाने जरी जिंकला असला तरी ओमान संघाने कडवी झुंज दिली. भारत-पाक लढतीपेक्षा हा सामना रोमांचक झाल्याचं पाहायला मिळालं. भारतीय संघाने सुपर ४ मधील आपले स्थान पक्के केले आहे. ओमान संघाला पराभूत करत यंगिस्तान भारतीय संघाने विजयाची हॅट्रिक पूर्ण केली. या सामन्यामध्ये प्लेइंग ११ मध्ये काही बदल केलेले पाहायला मिळाले होते. युवा गोलंदाज अर्शदीप सिंग याला या सामन्यात संधी मिळाली होती. संधीचं सोनं करत अर्शदीप सिंगने मोठा विक्रम नावावर केला आहे.

अर्शदीप सिंगने ओमानविरुद्धच्या ग्रुप स्टेजमधील शेवटच्या सामन्यात १ विकेट घेत इतिहास रचला. त्याने डावाच्या शेवटच्या षटकात विनायक शुक्लाला बाद करून आपल्या टी आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत विकेट्सचे शतक पूर्ण केले. या १०० विकेट्ससह त्याने एक जागतिक विक्रमही आपल्या नावावर केला आहे. अर्शदीप सिंग आता टी आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात वेगवान गोलंदाज म्हणून सर्वात कमी डावांमध्ये १०० विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला आहे.

अर्शदीप सिंगने ६४ डावांमध्ये १०० विकेट्स घेत पहिले स्थान पटकावले आहे. अर्शदीप सिंगने २०२२ मध्ये भारतीय संघासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि तेव्हापासून तो भारतीय गोलंदाजीचा महत्त्वाचा भाग बनला आहे. त्याने आतापर्यंत भारतीय संघासाठी ६४ टी आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एकूण १०० विकेट्स घेतले आहेत. ९ धावा देऊन चार विकेट्स घेणे ही त्याची सर्वोत्तम कामगिरी आहे.

भारताने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ओमानसमोर १८९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानने २० षटकांत ४ गडी गमावून १६७ धावा केल्या आणि भारताला कडवी झुंज दिली. भारतीय संघाने ओमानविरुद्ध २१ धावांनी विजय मिळवला. संजू सॅमसनने ४५ चेंडूत ५६ धावांची खेळी केली, ज्यात तीन चौके आणि तीन षटकारांचा समावेश होता. अभिषेक शर्माने ३८ धावांचे योगदान दिले, तर तिलक वर्मा याने २९ धावा केल्या. ओमानकडून आमिर कलीमने ६४ आणि हम्माद मिर्झाने ५१ धावा केल्या, पण ते ओमानला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021